आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता

१४ जुलै २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्राला जगाचं आर्थिक विकासाचं शक्तीकेंद्र बनवण्याचं लक्ष्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- मुंबईतल्या, २९ हजार ४०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी

- सात राज्यांमधल्या तेरा विधानसभा मतदारसंघांमधे झालेल्या पोटनिवडणुकीचे निकाल जाहीर / पश्चिम बंगालमधल्या चारही मतदारसंघांमधे तृणमूल काँग्रेसचे उमेदवार विजयी

- मुंबई, पुणे आणि कोकणाला पावसाचा तडाखा / मुंबई आणि पुणे जिल्ह्याला आज आणि उद्या रेड अलर्ट, तर पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी

**आणि**

- चौथ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा झिंबाब्वेवर निर्णायक विजय

**<><><><><>**

महाराष्ट्राला जगातलं आर्थिक विकासाचं सर्वात मोठं शक्तीकेंद्र आणि फिन्टेक राजधानी बनवणं हे आपलं हे आपलं स्वप्न असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज मुंबईत झालेल्या कार्यक्रमात विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री**

आज सुरू केलेल्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारनं ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण

बंदराच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे, यातून राज्यात १० लाख रोजगार निर्माण होतील, असं ते म्हणाले.

येत्या काळात महाराष्ट्र भारतात विकासाची नवी गाथा रचणार आहे आणि आपण त्याचे सहप्रवासी असणार आहोत, असं त्यांनी सांगितलं.

देशाच्या जनतेनं येत्या २५ वर्षात विकसित भारत घडवण्याचं स्वप्न पाहीलं आहे, त्यात मुंबई - महाराष्ट्राची भूमिका सर्वात महत्वाची असेल, त्यामुळेच इथलं जीवनमान सुधारण्यासाठी मुंबईच्या आसपासच्या दळवळण सुविधांमध्ये मोठ्या सुधारणा घडवण्याचे प्रयत्न केले जात असल्याचं ते म्हणाले. संत ज्ञानेश्वर पालखी, आणि संत तुकाराम पालखी मार्गचं काम पूर्ण झालं असून, लकवरच हे दोन्ही मार्ग प्रवाशांच्या सुविधेसाठी उपलब्ध होतील असं सांगत, त्यांनी वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते मुंबईतल्या २९ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित विविध प्रकल्पांचं उद्घाटन, लोकार्पण, पायाभरणी झाली. यात ठाणे - बोरिवली बोगदा, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, कल्याण यार्डाची पुनर्रचना, नवी मुंबईमध्ये तुर्भे इथं गतिशक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनलची निर्मिती यांची पायाभरणी याचा समावेश आहे. याशिवाय प्रधानमंत्र्यांनी राज्य सरकारच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेला सुरुवात केली. लोकमान्य टिळक टर्मिनस इथला नवा फलाट तसंच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वरच्या विस्तारित १० आणि ११ क्रमांकाच्या फलाटाच लोकार्पणही त्यांनी हस्ते झालं.

प्रधानमंत्री राज्यात आले की प्रगती आणि विकासाची दार उघडतात. सर्व सामान्य माणसाचं आयुष्य सुखकर करणं हा मोदींचा अजेंडा आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमात बोलताना म्हणाले. राज्य सरकारच्या विविध प्रकल्पांचे

प्रस्ताव कुठल्याही कपातीशिवाय मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्र्याचं आभार मानले. या प्रकल्पांमुळे गरीब कल्याणासह पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी इतिहासात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नाव लिहिलं जाईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच राज्यात आल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं.

राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, रामदास आठवले, राज्यातले मंत्री दीपक केसरकर, मंगल प्रभात लोढा हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

आपल्या आजच्या मुंबई भेटीत प्रधानमंत्र्यांनी आज इंडियन न्यूजपेपर सोसायटी अर्थात आयएनएसच्या वांद्रे कुर्ला संकुलातल्या १४ मजली इमारतीचं उद्घाटनही केलं.

**<><><><><>**

सर्वसामान्य लोकांना कायद्याची मुलतत्त्वं सोप्या भाषेत समजाऊन देता आली नाहीत तर तो कायदे शिक्षण आणि कायद्याच्या व्यवसायामधला दोष आहे, असं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड यांनी म्हटलं आहे. ते आज लखनौ इथं डॉ. राममनोहर लोहिया राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. कायद्याचं शिक्षण प्रादेशिक भाषेत मिळायला हवं, यावर त्यांनी भर दिला. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज, नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत व्हायब्रंट व्हिलेज या उपक्रमाचा आढावा घेतला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार सीमाभागातल्या खेड्यांच्या विकासासाठी वचनबद्ध असल्याचं या बैठकीत शहा यांनी सांगितलं. गावांमध्ये रोजगाराची संधी निर्माण करणं आणि स्थलांतर रोखण्यासाठी खेड्यांशी रस्तेजोडणी वाढवणं गरजेचं आहे,

असंही शहा म्हणाले. सीमाभागात तैनात केलेल्या लष्कराच्या जवानांना गावातल्या स्थानिक लोकांकडून शेतातली उत्पादनं आणि हस्तकलेद्वारे बनवलेल्या वस्तू विकत घेण्यासाठी प्रोत्साहित केलं पाहिजे, तसंच गावातल्या लोकांना लाभ होण्यासाठी लष्कर आणि सीएपीएफच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

सात राज्यांमधल्या तेरा विधानसभा मतदारसंघांमधे झालेल्या पोटनिवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. पंजाबमधल्या जालंधर पश्चिम मतदारसंघात आम आदमी पार्टीचा उमेदवार विजयी झाला आहे. हिमाचल प्रदेशमधल्या देहरा आणि नलगढ मतदारसंघात काँग्रेसच्या, तर हमीरपूरमध्ये भाजपा उमेदवाराने विजय मिळवला आहे. पश्चिम बंगालमधल्या रायगंज, बागडा, रणघाट दक्षिण, आणि मणिकताल या चारही मतदारसंघांमधून तृणमूल काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. मध्य प्रदेशातल्या अमरवाडामध्ये भाजपा, तर उत्तरखंडमधल्या बद्रीनाथ आणि मंगलौरमध्ये काँग्रेसचे उमेदवार जिंकले. बिहारच्या रुपौली इथं अपक्ष उमेदवार शंकर सिंह विजयी झाले असून, तमिळनाडूतल्या विक्रवंडीमध्ये द्रमुकच्या उमेदवारानं विजय मिळवला आहे. १० जुलै रोजी या निवडणुकीसाठी मतदान झालं होतं.

**<><><><>**

**मुंबई, पुणे** आणि आसपासच्या भागांना आज सकाळपासून पावसानं झोडपलं. मुंबईत मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावरच्या वाहतुकीला पावसाचा फटका बसला. हवामान विभागानं मुंबई आणि पुणे जिल्ह्यात आज आणि उद्या रेड अलर्ट जारी केला आहे. पावसामुळे **मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी** सह अनेक ठिकाणच्या सखल भागात पाणी साचलं. अंधेरी, मिलन सबवे आणि मालाड

सबवे मध्ये पाणी साचल्यानं हे मार्ग वाहतुकीसाठी बंद करावे लागले. हवामान विभागानं **रत्नागिरी** आणि **सिंधुदुर्ग** जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

उल्हासनगर शहरात अनेक ठिकाणी पाणी तुंबलं. मद्रासी पाड्यात अनेक घरात पाणी शिरलं. तर वालधुनी नदीनं धोक्याची पातळी गाठली.

**<><><><><>**

झिंबाब्वेमधे हरारे इथं आज झालेल्या चौथ्या टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारतानं झिंबाब्वेवर १० गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, आणि झिंबाब्वेचा डाव १५२ धावांवर संपुष्टात आणला. झिंबाब्वेचा कर्णधार सिंकदर रझानं सर्वाधिक ४६ धावा केल्या. भारतातर्फे खलिल अहमदनं २, तर तुषार देशपांडे, वाशिंग्टन सुंदर, अभिषेक शर्मा, आणि शिवम दुबे, यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

भारतानं विजयी लक्ष्य एकही गडी न गमावता १६ व्या षटकातच पार केलं. यशस्वी जयस्वालनं नाबाद ९३, शुभमन गिलनं नाबाद ५८ धावा केल्या. १५ षटकं आणि २ चेंडूत भारतानं १५६ धावा केल्या.

या विजयामुळे  पाच सामन्यांच्या मालिकेत भारतानं ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. त्यामुळे उद्या होणारा या मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना औपचारिक ठरणार आहे.

**<><><><><>**

भाजपाचे खासदार नारायण राणे यांच्या रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातल्या विजयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देणारी याचिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी दाखल केली आहे. निवडणूक जिंकण्यासाठी राणे यांनी पैशांचा गैरवापर आणि मतदारां ंवर दबाव आणल्याचा आरोप या याचिकेत केला आहे. तसंच निवडणूक प्रचाराचा कालावधी संपल्यावरही राणे यांचा प्रचार सुरू होता असा आरोप यात केला आहे. निवडणूक

आयोगाकडे तक्रार करूनही कारवाई न झाल्यामुळे ही याचिका दाखल केल्याचं राऊत यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज नवी मुंबईतल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाची पाहणी केली. हे काम सध्या वेगानं सुरू आहे. या विमानतळाचा पहिला टप्पा मार्च २०२५ पर्यंत प्रवाशांसाठी खुला करण्याचं नियोजन आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

पहिल्या टप्प्याचं काम पूर्ण झाल्यावर या टर्मिनलवरून वर्षाला २ कोटी प्रवासी ये-जा करू शकतील. तर, हे विमानतळ पूर्ण क्षमतेनं कार्यान्वित झाल्यावर दरवर्षी ९ कोटी प्रवाशांना ये-जा करता येईल, असं मोहोळ यांनी बातमीदारांना सांगितलं.

**<><><><><>**

सुरक्षित डिजीटल पर्यावरणामुळे संशोधनाला बळ मिळत असून त्याने गुंतवणूक वाढीला चालना मिळते असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत जागतिक दहशतवाद विरोधी समितीनं आयोजित केलेल्या तिसऱ्या सायबर सुरक्षा  परिषदेत बोलत होते. सायबर सुरक्षित संस्कृती निर्माण केली पाहिजे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या महायुती सरकारच्या कारभारावर कॅगनं गंभीर ताशेरे ओढले असून  राज्यावरचा ८ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर चिंताजनक असून सरकार  पुरवणी मागण्या आणि कर्जाचे  समर्थन करतं असलं तरी ही कॅगने सरकारच्या कार्यपद्धतीला लगावलेली चपराक  आहे. असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

तीन पक्षांचं महायुती सरकार सत्तेत आल्यापासून सर्वच विभागात भ्रष्टाचार बोकाळला आहे. असंही ते म्हणाले. गेल्या दोन वर्षात या सरकारने तब्बल अडीच

लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज काढल्याने राज्यावर ८ लाख कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. जे राजकोषीय स्थूल उत्पन्नाच्या १८. पूर्णांक ७३ शतांश टक्के असल्याचही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

प्राप्तिकर विभागानं २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ६ लाख ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक प्रत्यक्ष कर संकलन केलं आहे तसंच या महिन्याच्या ११ तारखेपर्यंत ७० हजार ९०२ कोटी रुपयांचा परतावा जारी केला आहे. एकूण संकलनात २ लाख ६५ हजार ३३६ कोटी रुपये कॉर्पोरेट कर, ३ लाख ६१ हजार ८६२ कोटी रुपये वैयक्तिक प्राप्तिकर आणि १ हजार ४२६ कोटी रुपये इतर करांचा समावेश असल्याचं प्राप्तिकर विभागानं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><><>

कांदा, कापूस आणि सोयाबीन दरांच्या चढउतारांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरच दिलासा देण्याचं आश्वासन केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना दिलं आहे. पाशा पटेल यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे. शेतकऱ्यांच्या संबंधित शेतमालाचे आयात निर्यात धोरण आणि आयात शुल्क याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याशी तातडीने बैठक करून या विषयांवर ठोस निर्णय घेणार असल्याचं केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी या बैठकीमध्ये स्पष्ट केलं.

//<><><><><>//